## कोणकोणत्या प्रकारे कौटुंबिक हिंसाचार केला जातो?



### शारीरिक हिंसाचार

थप्पड मारणे, हाड मोडणे, वार करणे, चावे घेणे, केस ओढणे, मारहाण, ढकलणे, गुद्दे मारणे, गळा दाबणे, लाथा मारणे, हत्यार दाखवून धमकी देणे किंवा त्याने जखम करणे, ॲसिड हल्ला.



### लैंगिक हिंसाचार

बलात्कार, बलात्काराचा प्रयत्न, छेडछाड, विनयभंग, जबरदस्तीचे, वेदनादायी लैंगिक संबंध, नको असलेल्या लैंगिक कृती, स्पर्श/दाबणे जबरदस्ती करणे, इच्छेविरुद्ध लग्न किंवा बालविवाह, गर्भ निरोधकाच्या वापरास नकार, इतर कुटुंबियांचे लैंगिक वर्तन, बाल लैंगिक शोषण, लैंगिक संबंधापासून वंचित ठेवणे.



### आर्थिक हिंसाचार

मालमत्तेवरचा वारसाहक्क नाकारणे, पैसे न देणे, तिची कमाई बळकावणे, घराबाहेर काढण्याची धमकी देणे, घराबाहेर हाकलणे, तिला अन्न, वस्त्र, शिक्षण, आरोग्यसेवा यापासून वंचित ठेवणे, कमाई करण्यास मनाई, केलेल्या खर्चाबद्दल जाब विचारणे, हुंड्याची मागणी,



### भावनिक हिंसाचार

दुर्लक्ष करणे, मानसिक त्रास, मारहाण करण्याच्या, जीवे मारण्याच्या धमक्या, एकटे पाडणे, शिव्या, संशय, मुलांचं पालकत्व नाकारणे, खाजगी आणि सार्वजनिक ठिकाणी अपमान करणे, प्रत्येक कृतीत चुका काढणे इत्यादी.

## महिलेवर नियंत्रण ठेवण्याचे वर्तन म्हणजेच कौटुंबिक हिंसाचार

**बऱ्याचदा नवरा किंवा कुटुंबीय महिलेच्या वर्तनावर नियंत्रण ठेवतात. त्याचा तिच्या आरोग्यावर फार परिणाम होतो.**

**नियंत्रणाचे प्रकार :**

- महिलेला घराबाहेर जाण्यास मनाई करणे,
- माहेरचे कुटुंबीय, मित्र मैत्रिणी किंवा डॉक्टरकडे जाण्याची परवानगी नसणे
- ती कोणाला भेटते किंवा कोणाशी बोलते यावर लक्ष ठेवणे
- तिचा द्वेष करणे
- ती फोनवर कुणाशी बोलते, ती कुठे जाते येते यावर पाळत ठेवणे

**नियंत्रणाचे महिलांच्या आरोग्यावर होणारा परिणाम:**

महिलांचा वावर, निर्णयक्षमता आणि आर्थिक व्यवहारावर मर्यादा येणे
त्यांना वेळेवर आणि पुरेशी आरोग्यसेवा न मिळणे
अनेकदा उपचारांना विलंब, त्यातून गुंतागुंत वाढणे.
महिला आणि त्यांच्या मुलांच्या आरोग्यावर परिणाम



## आकडेवारी काय सांगते

### भारतातील कौटुंबिक हिंसाचार

- **प्रसार:** 18-49 वयोगटातील भारतातील सुमारे 33 टक्के विवाहित महिलांवर त्यांच्या पतींकडून शारीरिक, लैंगिक किंवा भावनिक हिंसाचार होतो. (NFHS-५).
- **मदत मागणे:** यापैकी फक्त 14.5 टक्के महिलांनी मदत मागितली आहे.
- **आरोग्य व्यवस्था सहाय्य :** मदत मागणाऱ्यांपैकी फक्त 2 टक्के महिला मदतीसाठी आरोग्य यंत्रणेकडे गेल्या होत्या.

### महाराष्ट्रातील कौटुंबिक हिंसाचार

- महाराष्ट्र राज्यात कौटुंबिक हिंसाचाराचे प्रमाण जास्त आहे.
- कौटुंबिक हिंसाचाराच्या घटनेत महाराष्ट्र भारतातील पहिल्या ५ राज्यांमध्ये आहे.
- पती किंवा त्याच्या नातेवाईकांकडून क्रूर वर्तनाची 11,367 प्रकरणे नोंदवली गेली (एनसीआरएस 2022)
- हिंसाचाराला सामोरे गेलेल्या सुमारे 50 टक्के महिलांना शारीरिक दुखापत झाली होती.

(स्रोत: एनएफएचएस-5 आणि एनसीआरएस, 2022)

## महिला आणि मुलांच्या आरोग्यावर कौटुंबिक हिंसाचाराचेखालील परिणाम होतात:

### १. मानसिक आरोग्य

- पोस्ट-ट्रॉमॅटिक स्ट्रेस आघातानंतर येणारा तणावाचा त्रास (PTSD) - यामध्ये भूतकाळात रमणे (फ्लॅशबॅक), नकारात्मक विचार, हिंसाचाराची आठवण करून देणाऱ्या लोकांपासून किंवा ठिकाणांपासून दूर राहणे, भयावह स्वप्नं, बचावात्मक पवित्र, चिडचिड किंवा सहज रागावणे, झोप याला त्रास होणे.
- नैराश्यामध्ये सतत दुःख किंवा निराशा, कोणतही काम, उपक्रमात मध्ये रस न घेणे, झोपेच्या, जेवणाच्या सवयीत बदल, सतत थकवा किंवा उर्जेचा अभाव, न सांगता येणारी वेदना, डोकेदुखी किंवा पचन समस्या, आत्मविश्वास कमी होणे.
- ताण आणि चिंतेमध्ये चिडचिड, थकवा, स्नायू दुखणे, पचन समस्या, अस्वस्थ वाटणे, लक्ष केंद्रित करण्यात अडचण येणे, हृदयाचे ठोके वाढणे.
- स्वतःला हानी पोहोचवण्यासाठी कृती करणे किंवा आत्महत्येचा प्रयत्न करणे (उदा. कीटकनाशक किंवा विष सेवन).

### २. शारीरिक आरोग्य

- जखमा, खरचटणे, भाजणे, वार होणे आणि हाडे मोडणे
- वारंवार दुखापतींमुळे अपंगत्व
- अशक्तपणा आणि कुपोषण (वजन कमी किंवा जास्त असणे)
- उच्च रक्तदाब, मधुमेह,
- अत्यंत गंभीर परिस्थितीत महिलेचा मृत्यू किंवा खून होऊ शकतो.

### ३. लैंगिक आणि प्रजनन आरोग्य

- कौटुंबिक हिंसाचाराचा सामना करणाऱ्या महिलांना अनेकदा लैंगिक संबंध, गर्भधारणा आणि बाळंतपणाशी संबंधित अनेक आरोग्य समस्यांना तोंड द्यावे लागते.
- वेदनादायक लैंगिक संबंध
- वारंवार अनपेक्षित किंवा अनियोजित गर्भधारणा
- वारंवार केलेले गर्भपात
- गर्भपात किंवा गर्भधारणा गमावणे
- ओटीपोटात दीर्घकाळ वेदना आणि संसर्ग (पीआयडी)
- अकाली किंवा मृत बाळंतपण

### ४. आरोग्यास अपायकारक वर्तन

- ताण, नियंत्रण आणि दुर्लक्ष यामुळे कौटुंबिक हिंसाचारग्रस्त महिला अनेकदा आरोग्याला अपाय होईल असे वर्तन करतात.
- नियमितपणे औषधे घेण्यास असमर्थ असतात.
- स्वतःसाठी किंवा मुलांना आरोग्य सेवा घेण्यास टाळतात, चुकवतात किंवा उशीर करतात.
- अनियमित आहार - जास्त किंवा कमी खातात.
- कमी शारीरिक हालचाली करतात.
- वैयक्तिक स्वच्छता किंवा स्वतःची काळजी याकडे दुर्लक्ष करतात.
- ताणतणावाचा सामना करण्यासाठी तंबाखू, दारू किंवा इतर अंमली पदार्थांचा वापर करतात.

### ५. कौटुंबिक हिंसाचाराचे मुलांवर होणारे परिणाम

कौटुंबिक हिंसाचार सहन करणाऱ्या महिलांच्या मुलांच्या आरोग्यावर अनेक विपरीत परिणाम होतात.

- त्यांचे पालक किंवा देखभाल करणारे मुलांवर हिंसाचार किंवा दुर्लक्ष करतात. त्या आघातामुळे त्यांना मानसिक ताण येतो : अप्रिय आठवणी, भयावह स्वप्ने, कुटुंब किंवा मित्रांपासून दूर जाणे किंवा ते असतील त्या जागा किंवा लोकांना टाळणे, रागाचा उद्रेक, सतत घाबरणे, कोणत्याही वैद्यकीय कारणाशिवाय पोटदुखी किंवा डोकेदुखी, अंथरुण ओले होणे, सतत कोणालातरी चिकटून राहणे, चिडचिड.
- मद्यपान किंवा धूम्रपान किंवा ड्रग्ज वापरणे.
- शाळेशी संबंधित समस्या - शैक्षणिक कामगिरी खालावते.
- इतर मुलांशी सामाजिक संवाद घडत नाही.
- नैराश्य : सतत बदलणारी मनःस्थिती, दुःखाची भावना, निराशा, झोपेचा त्रास, सतत रागराग करणे, हसून खेळून जगत नाहीत, अशक्त, कमी आत्मविश्वास, खूप जास्त किंवा खूप कमी खाणे.
- इतरांसोबत शारीरिक किंवा तोंडी आक्रमक वागणे.

### केस स्टडी

एका महिलेला तिची सासू आणि पती मुलांची योग्य देखभाल न घेतल्याबद्दल सतत टोमणे मारत होते. तिच्याकडे ना पैसे होते ना घराबाहेर पडण्याची परवानगी, घरातल्या सर्वजणांचा स्वयंपाक आणि घराची साफसफाई करावी लागत होती. या तणावामुळे तिला डोकेदुखीचा त्रास होत होता. उपकेंद्रात गेल्यावर तिने डोकेदुखीचे औषध मागितले, परंतु कौटुंबिक हिंसाचाराच्या तणावाबद्दल ती कधीही बोलली नाही. कालांतराने, या दीर्घकालीन ताणामुळे तिला उच्च रक्तदाबाचा त्रास होऊ लागला ज्यासाठी तिला आणखी महागडी औषधे घ्यावी लागली.

मासूम

प्रकाशक:
**महिला सर्वांगीण उत्कर्ष मंडळ (मासूम)**
सदनिका क्र. ४२, कुबेरा बिहार, बी-१, गाडीतळ, हडपसर, पुणे ४११०२८
फोन : ९१ - २० - २६९९५६२५ / ३३
ईमेल : masum.puneindia@gmail.com
वेबसाइट : www.masum-india.org.in

सहाय्य :
WhatWorks TO PREVENT VIOLENCE AGAINST WOMEN AND GIRLS
UKaid from the British people

माहितीपत्रक 1:

# कौटुंबिक हिंसाचार ही आरोग्य समस्या का महत्वाची आहे?

